Scan QR code to visit... Epaper Portal

दैनिक
www. sahyandrinews.com

# सह्याद्रीचा राखणदार

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

Scan QR code to visit... Epaper Portal

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक २४६ • Title - Code :- MAHMAR49513 • सोमवार दि.१७ जून २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# फडणवीस आणि त्यांच्या पिलावळांनी सोलापुरात दंगलीचा कट आखला होता

## हे लोक रक्ताने राजकारण करतात ;प्रणिती शिंदे यांचा आरोप

**सोलापूर (वृत्तसंस्था)**–लोकसभा निवडणुकीत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि त्यांच्या पिलावळांनी सोलापुरात दंगली घडवण्याचा कट आखला होता. लोकसभेच्या मतदानाआधी दोन दिवस दंगल घडवणार होते. हे लोक रक्ताने राजकारण करतात, असा गंभीर आरोप सोलापूरच्या काँग्रेस खासदार प्रणिती शिंदे यांनी केला आहे.प्रणिती शिंदे यांनी देवेंद्र फडणवीसांसह सोलापुरातील भाजप नेत्यांचे नाव घेत हा गंभीर आरोप केला. त्यामुळे पुन्हा एकदा खळबळ उडाली आहे. आता भाजपच्या गोटातून या आरोपाला काय प्रत्युत्तर मिळते ते पाहावे लागेल.

सोलापूर लोकसभा मतदारसंघातून विजयी झाल्यानंतर कृतज्ञता मेळाव्यात बोलताना खासदार प्रणिती शिंदे म्हणाल्या की, भाजपावाले ही लोक रक्ताने राजकारण करतात. भाजपवाल्यांना लाज वाटायला पाहिजे, असा निशाणा त्यांनी लगावला.प्रणिती शिंदे म्हणाल्या की, भाजपचे राज्यातील बडे लोक हे गावामध्ये जिल्ह्यामध्ये येऊन भांडण आणि दंगल लावण्याचा प्रयत्न करणार होते. ते कानात सांगितलं गेलं होतं. मतदानाच्या दिवशी पोलिंगवर काय झालं होतं. सीपीनी सांगितलं होतं, जा बाहेर नाहीतर उमेदवारावर एफआयआर करावा लागेल. त्यावेळेस भाजपवाल्यांना कळलं होतं निवडणूक आपल्या हातातून गेली आहे. आता एकच उपाय आहे, दंगल घडवून आणा. निवडणुकीत लोकांमध्ये विभागणी करा आणि निवडून या असं त्यांना सांगण्यात आलं होतं. त्यांची पाच दिवस अगोदरची भाषण काढून बघा, असे म्हणत प्रणिती शिंदे यांनी राम सातपुतेंवर देखील निशाणा साधला.संविधान संपविण्याची भाषा करणाऱ्यांना जनतेने चपराक लावली. भाजप आणि दहशतवाद्यांमध्ये काय फरक आहे? हे देशात राहून भांडण लावत आहेत. लोकसभा निवडणुकीवेळी सोलापुरात दंगली घडविण्याची योजना होती. भाजपने किती पैसे वाटप केले. एक साडी आणि ५०० रुपये दिल्याचा आरोप त्यांनी केला. पैसे दिले तरी तुम्ही त्यांना मतदान केले नाही, असे त्या सभेला उद्देशून म्हणाल्या. शिंदे यांनी केलेल्या गंभीर आरोपामुळे आता भाजपकडून काय उत्तर दिले जाणार याकडे सर्वांच्या नजरा लागून आहेत.प्रणिती शिंदे या कार्यक्रमात बोलताना पुढे म्हणाल्या की, हा विजय सर्वसामान्य माणसाचा, कामगारांचा, कष्टकरी माणसाचा आहे. मी खासदार केवळ तुमच्यामुळे झाली आहे, याची मला जाणीव आहे. खासदारकी डोक्यात गेली, असं जेव्हा तुम्हाला वाटलं तर,



दणकण मला खाली ओढा. शिंदे साहेब म्हणाले की, माझे नेतृत्व अनेकजण स्वीकारायला तयार नाही, पण शिंदे साहेब तुम्ही किंगमेकर आहात, न संपणारे नेतृत्व आहात. तुम्ही अनेक निवडणुका लढल्या, मी स्वतः पाहिलंय की, आमच्या घरी लोकं चाकू-तलवार घेऊन आले होते. अशा निवडणुका तुम्ही लढल्या, लढाऊपणा मी तुमच्याकडून शिकले, असं म्हणत प्रणिती शिंदेंनी सुशीलकुमार शिंदेंचे तोंड भरून कौतुक केलं.प्रणिती शिंदे म्हणाल्या की, मी लहानपणापासून सत्ता बघितली, घरासमोर नेहमी लाल दिव्याची गाडी होती. मी लोकांचे काम करण्यासाठी राजकारणात, मी सत्तेसाठी राजकारणात आलेली नाही. महाविकास आघाडी असताना आम्ही कधीही मंत्रिपद मागितलं नाही, हे ऑन रेकॉर्ड आहे. मी शिवसेना उद्धव साहेबांचे खास आभार मानते, प्रत्येक ठिकाणी खांद्याला खांदा लावून त्यांनी काम केलं. भाजपवाले म्हणायचे, आम्हाला नका बघू आणि मोदींना बघून मतदान झालं, बरं झालं ते असं म्हणाले त्यांच्यामुळेच तुम्ही मोदींना बघितलं आणि मला मतदान केलं, असंही त्यांनी यावेळी म्हटलं आहे.प्रणिती शिंदे पुढे म्हणाल्या की, जे मतदारसंघात फिरले नाहीत त्या भाजपच्या आमदाराचे ही आभार मानते. १४ खासदार हे आता काँग्रेसचे आहेत, येणारा काळ हा देखील काँग्रेसचा आहे. आता एकच फाईट, कॉलर टाईट. केवळ माझी नाही तुमची ही कॉलर टाईट. इथून पुढे आता कामं घेऊन या, माझ्याकडे यायला कोणीही रोखणार नाही, पुढाऱ्यांचा आदर करते, पण तुम्ही देखील थेट कामं घेऊन या. मी कामं केलं नाही तर, कान पकडून मला खाली बसवा, असं प्रणिती शिंदे यांनी म्हटलं आहे.

## थोडक्यात

### एसटी महामंडळाचे मोफत पास आता थेट शाळा–कॉलेजमध्येच मिळणार

**मुंबई**–शाळा- महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या लाखो विद्यार्थी आणि विद्यार्थिनींसाठी अत्यंत आंनदाची बातमी समोर आली आहे. आता एसटी महामंडळाचे पास काढण्यासाठी विद्यार्थ्यांना रांगेत थांबवण्याची आवश्यकता नाही. तर त्यांचे पासेस थेट त्यांच्या शाळेत वितरित करण्यात येणार आहे. त्यासाठी एसटी महामंडळाला सूचना देण्यात आल्या आहेत. एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर यांनी स्थानिक एसटी प्रशासनाला तशा सूचना दिल्या असल्याची माहिती मिळाली आहे.नवीन वर्षाच्या पहिल्या सत्रातील शाळा शनिवारपासूनच सुरू झाल्या आहेत. त्यामुळे दूरवर शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांना एसटी बसने प्रवास करावा लागतो. त्यासाठी त्यांना सवलत देखील दिली जाते. मात्र, विद्यार्थ्यांना पास काढण्यासाठी रांगेत उभे राहावे लागते. विद्यार्थ्यांना होणारा हा त्रास थांबवण्यासाठी एसटी महामंडळाच्या वतीने हा महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे.विद्यार्थ्यांना एसटीच्या माध्यमातून ६६% इतकी सवलत दिली जाते. तर केवळ ३३% रक्कम भरून विद्यार्थ्यांना मासिक पास काढता येतो. तसेच पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर योजनेअंतर्गत बारावीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थिनींना मोफत एसटी पासचे वितरण केले जाते. यासाठी विद्यार्थिनींना एसटीच्या पास केंद्रावर जाऊन रांगेत उभा राहावे लागत होते. विद्यार्थिनींना होणारी गैरसाय टाळण्यासाठी एसटी महामंडळाने हा निर्णय घेतला आहे.

### नीट घोटाळ्यांचे कनेक्शनही गुजरातसोबत हा योगायोग कसा?:जितेंद्र आव्हाड

**मुंबई**–नीट परिषदेतील गोंधळाबाबत शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी केंद्रातील भाजप सरकारवर गंभीर आरोप केले आहेत. या प्रकरणात पेपर फोडल्याची कबुली दिलेली असताना सरकार मूग गिळून गप्प बसले असल्याचा आरोप आव्हाड यांनी केला आहे. इतकेच नाही तर नीट घोटाळ्यांचे कनेक्शनही गुजरातसोबत हा योगायोग कसा? असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला आहे.या संदर्भात जितेंद्र आव्हाड यांनी एका पोस्टच्या माध्यमातून भाजप सरकावर निशाणा साधला आहे. यामध्ये त्यांनी पेपरफुटीबाबत जितका हलगर्जीपणा सरकार दाखवतंय त्यावरून ते या विषयाबाबत किती गंभीर आहे हे दिसत असल्याचे आव्हाड यांनी म्हटले आहे. जबाबदाऱ्यांपासून पळून जाणे ही पंतप्रधान मोदी आणि त्यांच्या मंत्र्यांची जुनी सवय असल्याचा आरोपही आव्हाड यांनी केला आहे.

## सावरगाव येथिल तरुणा मुळे अट्टल चोरटा तळोधी (बा ) पोलिसांच्या ताब्यात



**तळोधी(बा) । प्रतिनिधी**

नागभीड तालुक्यातील सावरगाव येथे दि.१५ जून शनिवार रोजी सकाळी ०६.०० वा चे सुमारास सावरगाव बस स्थानकाजवळ एक ईसम संशयितरित्या फिरत असतांना त्याचावर संशय आल्याने ग्रामपंचायत लिपिक लोकेश पंतुजी राउत सावरगाव या तरुणाने त्यास बोलण्यात गुंतवुण ठेवले त्यांनतर सामाजिक कार्यकर्ते भारत चुनाकर यांच्या मदतीने लगेच तळोधी पोलीसांना माहीती देवुन बोलावुन घेतले. सदर तरुणास पोलीसांनी ताब्यात घेवुन त्यास पोलीस खाक्या दाखवुन माहीती घेतली असता त्याचे नाव राजु बालाजी दुर्वे रा.धामणगाव चक ता.नागभिड असे असुन तो अट्टल चोरटा आहे. त्याने सकाळी एच. पी. पेट्रोलपंप ,सावरगाव जवळुन २ ट्रक चालकांचे मोबाईल चोरल्याचे कबुली दिलेली आहे.

तक्रारदार नामे सुरेशकुमार दुजैई गौतम वय. ३५ वर्षे रा. नरहन गौंडा , लक्खा बौंदी ता.महसील जि. बवराईच , उत्तर प्रदेश यांचे तक्रारीनुसार तळोधी पोस्टे अप क्र. ९६/२४ कलम ३७९ भादवि प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. त्याच्याकडुन ०२ मोबाईल व स्प्लेंडर मोसा क्र. एम एच ३४ व्ही २२५ जप्त करण्यात आलेली असुन त्यास अटक करण्यात आलेली आहे.

## लाखो रुपये किमतीचा सुगंधित तंबाखू जप्त, आरोपी फरार

**मुल । प्रतिनिधी**



चंद्रपूर स्थानिक गुन्हे शाखेने दिनांक १४ जुन २०२४ रोजी सायं. साडे चार ते ५ वाजताच्या दरम्यान मुल पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या राजोली या गावामध्ये एका घरी असलेल्या गोडाऊन वर धाड टाकून अवैद्य प्रतिबंधीत सुगंधित तंबाखुसह लाखोचा माल जप्त केला असून या प्रकरणातील मुख्य आरोपी मुल येथील लखन मानकानी हा फरार असून पोलीस त्याचा शोध घेत आहे.

पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन यांनी चंद्रपूर जिल्ह्यामध्ये सुरु असलेल्या अवैद्य धंद्यावर कडक कारवाई करण्याचे आदेश स्थानिक गुन्हे शाखेला दिले. त्या अनुषंगाने पोलीस निरीक्षक महेश कोंडावार यांनी पथक तयार केले आहे. गोपनीय माहितीच्या आधारे मुल पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या राजोली या गावांमध्ये मुल येथील लखन मानकानी हा एका घरी गोडाऊन म्हणून एक खोली किरायाने घेतला असून तिथे अवैद्य प्रतिबंधीत सुनगंधित तंबाखू चा साठा ठेवला असल्याची माहिती मिळाल्या नंतर सहाय्यक पोलीस निरीक्षक मनोज गडादे, पोहवा. दिपक डोंगरे, पोशी. गोपीनाथ नरोटे, अमोल सावे यांनी धाड टाकून ५ प्लास्टिक चुंगडया मध्ये ८०० पाऊच प्रत्येकी २०० ग्राम वजनाचे होला हुक्का शिशा तंबाखु ने सिलबंद असलेले पाऊच व एकूण २०० डब्बे प्रत्येकी ५० ग्राम वजनाचे मजा, १०८ हुक्का शिशा तंबाखु ने भरलेले सिलबंद डब्बे असा एकूण एक लाख ७८ हजार २०० रुपयांचा माल जप्त करण्यात आला आहे.

## बाळापुर (तळोधी ) येथे जुगाराची कारवाई

**तळोधी(बा) । प्रतिनिधी**

बाळापुर तळोधी येथे बस स्थानकावर अवैधरित्या सट्टापट्टी चालत असलेबाबत गावातील नागरिकांकडुन तक्रार येत होती. त्यानुसार १४ जून रोजी रात्री मिळालेल्या गोपनिय माहीतीनुसार तळोधी पोस्टेचे पोउपनि लांबट , पोउपनि मानकर , पोहवा वालदे , नापोशि सचिन साखरकर अशांनी रेड कारवाई केली असता तामदेव मोतारीमा सयाम वय. ५३ वर्षे रा.देवपायली हा ईसम स्ट्टापट्टीचे आकडे घेत असतांना मिळुन आला . तसेच दुसऱ्या ठिकाणी दिंगाबर ईसना कोकाडे वय. ५२ वर्षे रा.बाळापुर हा देखील त्याच्या पानठेल्यात लोकांकडुन पैसे घेवुन कागदावर वरली मटक्याचे आकडे घेतांना मिळुन आला. सदर ईसम हे पवन जिवन पराते रा. तळोधी याच्या सांगण्यावरुन सदर जुगाराचा धंदा करीत असल्याने त्यांचे विरोधात तळोधी पोलीस ठाणे येथे मुंबई जुगार अधिनियम कलम १२ अ व भादवि कलम १०९ प्रमाणे अप क्र. ९४/२४ व ९५/२४ दाखल करण्यात आलेले असुन सदर कारवाईत मोबाईल फोन व रोख रक्कम असा २१ हजार ६८६ रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे.

# पुलगावच्या तेजस्विनीची दुर्धर आजाराशी झुंज

## तेजस्विनीच्या उपचारासाठी बहिणीची धडपड ;आर्थिक मदतीची गरज

**पुलगाव । अविनाश भोपे**

येथील पंचधारा रोड, जिजामाता कॉलनी, वार्ड ३ येथील रहिवासी तेजस्विनी प्रभाकर भोयर, वय १९ वर्ष असून घरची अगदी हलाखीची परिस्थिती आहे. वडील हातमजुरी करता करता एका अपघाताने पायाला इजा झाली व वडील घरी स्थानबध्द झाले. तसेच तेजस्विनीची आई सुद्धा मोलमजुरीला जाऊन आपले घराचे उदरनिर्वाह करत होती. व कालांतराने त्यांचा हि काम करता करता अपघात झाला व त्या हि शारीरिक दृष्ट्या कमजोर झाल्या आणि त्यांना सुद्धा घरी स्थानबध्द व्हावे लागले. आईची तब्बेत सुद्धा चांगली राहत नसून वारंवार दवाखान्यात इलाज सुरु राहतो. अश्यात तेजस्विनीची मोठी बहिण मनस्वी हि अवघ्या २१ वर्षाची हिच्यावर स्वतःच्या शिक्षणासह घरची आई, वडील, व लहान बहिणीची जबाबदारी आली. व तिला लहान बहिणी विषयी फार प्रेम असल्याने मनस्वी शिक्षण करून बाहेर लहान मोठी नौकरी करून आपल्या बहिणीवर उपचार करण्या करिता पैशाची जुळवाजुळाव करत राहते. परंतु या परीस्थितीत मनस्वीला अनेक नौकऱ्या सोडाव्या लागल्या कारण तिला दवाखान्यात, घरात, व तिघांच्या सेवेत वेळ द्यावा लागत असल्याने नौकरी करिता सुद्धा वेळ पुरत नव्हता व अनेक दिवस सुट्ट्या घ्याव्या लागत होत्या. अश्यात अनेक मालकांनी तिला वेळे अभावी व सुट्ट्यामुळे नौकरी वरून मुक्त केले जात होते. अश्या हालाखीच्या परिस्थितीत मनस्वी आपल्या लहान बहिणीच्या आजारावर मात मिळवण्यासाठी आर्थिक परिस्थितीची जुळवाजुळव करत आहे.

मनस्वी आपल्या लहान बहिणी करिता तिच्या दुर्धर आजाराला लागत असलेला खर्च हा जवळपास लाखोच्या रुपयाच्या घरात आहे. यात शासनाकडून सुद्धा सहकार्य जास्त प्रमाणात झाले नाही. शासन दरबारी या आजारावर आर्थिक सहकार्य झाले नाही. मनस्वी वर्धा जिल्ह्यातील आमदार खासदारांच्या दरबारी गेली असता तिथे सुद्धा तिला आश्वासनाशिवाय काहीच मिळाले नाही. इतकेच नव्हे तर अमरावती भागातील सुद्धा आमदारांशी संपर्क साधला असता तिला कुठलेच यश आले नाही.तेजस्विनी ला बोन म्यारो हा आजार झाला आहे. हा आजार फार कमी प्रमाणात लोकांना होतो. त्यात तेजस्विनीला हा आजार वर्ष २०२३ ला झाला. तेव्हा पासून तेजस्विनी आपल्या हलाखीच्या परिस्थितीची जाणीव ठेवून आपले साधारण दवाखान्यात उपचार घेत आहे. सर्वप्रथम तेजस्विनी सेवाग्राम च्या दवाखान्यात दाखल झाली. तिला तेथून त्या आजारावर मात करण्या करिता नागपूर येथे शासकीय रुग्णालयात स्थलांतरित केले. तेथे सुद्धा तिच्या आजारावर उपचार होऊ शकले नसल्याने नागपूरच्या एम्स रुग्णालयात पाठवण्यात आले. तेथे थोडाफार उपचार करण्यात आला व तेथील डॉक्टरांनी तिला मुंबई येथे उपचारा करिता जाण्यास म्हटले. तेजस्विनी डॉक्टरांच्या सल्ल्याने मुंबईत सुद्धा हिंदुजा इस्पितळात दाखल




झाली. परंतु तेथील उपचाराचा खर्च हा झेपन्या सारखा नव्हता. तेथील एकूण अंदाजित खर्च हा ४५ लाख रुपये इतका आहे. व त्यामुळे त्या आजारावर उपचार अशक्य ठरला. आर्थिक परिस्थिती नसल्या कारणाने तेजस्विनी वरील उपचार हे आता कठीण होत चालले आहे.तरी सुद्धा आता तेजस्विनीला रक्ताच्या उलट्या सुद्धा सुरु झाल्या आहे व अश्या परिस्थितीत तिला दवाखान्यात दाखल करण्याची गरज जास्त प्रमाणात आहे. तिला नागपूर येथे प्राथमिक उपचाराकरिता न्यायचे असून मनस्वी आपल्या लहान बहिणी करिता आर्थिक परिस्थितीची जुळवाजुळव करत आहे. परंतु पैसा जास्त प्रमाणात उपलब्ध होऊ शकत नसल्याने तिने जनते समोर मदतीचा हात समोर केला आहे.तरी या वृत्तपत्राच्या माध्यमातून मनस्वीला सहकार्य म्हणून तिची हकीकत आपल्या पर्यंत पोहचवण्याचे कार्य करीत आहे. ज्या हि व्यक्तीला तिची मदत, आर्थिक सहकार्य करण्यास इच्छुक असाल त्यांनी मनस्वीच्या बँक खात्यात आपल्या कडून जितके सहकार्य होईल तितके करून पुलगावच्या तेजस्विनीला सहकार्य करून ईश्वरचरणी प्रार्थना करावी की, तेजस्विनीची प्रकृती चांगली होवो. तेजस्विनीला सहकार्य करण्याकरीता तिच्या मोठ्या बहिणीच्या मनस्वी प्रभाकर भोयर हिच्या खाली दिलेल्या बँक खात्यात आर्थिक सहकार्य करावे.

### या वर करा मदत

खाते धारकाचे नाव–मनस्वी प्रभाकर भोयर
बँकेचे नाव–भारतीय स्टेट बँक शाखा पुलगाव.
आय एफ एस सी नं.-SBIN0001415
खाते क्र.-३३२१७४६७८४०
मो.नं.-७२१८०८९९४६ (फोन पें.व गुगल पें)


# ऐतिहासिक विश्व अमरप्रेम कथेचे प्रतीक!

**आपल्या अत्यंत प्रीय बेगमच्या मृत्युपश्चात शहांजहाँ शोकसागरात बुडाला होता. असे देखील म्हंटले जाते, की मुमताज बेगमच्या मृत्युनंतर तो तब्बल २ वर्ष शोकमग्न होता. या दरम्यान आपल्या रंगीन आवडी निवडींकरता प्रसिद्ध असलेल्या शहांजहाँने आपल्या आवडी निवडी बाजुला सारल्या होत्या. या काळात त्याने कोणताही शाही लिबास परिधान केला नाही किंवा कोणत्याही शाही कार्यक्रमात उपस्थित देखील राहिला नाही. मुमताज महलच्या मृत्युनंतर शहांजहाँने आपल्या प्रेमाचे अमर प्रतिक म्हणून तिच्या स्मरणार्थ आग्रा येथे ताजमहालाची निर्मीती केली. ताजमहल आपल्या भव्यदिव्यतेमुळे आणि आकर्षक कलाकृतीमुळे जगातील सात आश्चर्यांपैकी एक गणला जातो. याच्या निर्मीतीकरता तब्बल तेवीस वर्षांचा अवधी लागला. आज भारतीय आणि विदेशी पर्यटकांचे हे मुख्य आकर्षण केंद्र ठरले आहे. जरूर वाचा अलककार– श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजींच्या शब्दांत हा माहितीपूर्ण लेख... संपादक.**



मोगल शासक शहाजहाँची सर्वात आवडती राणी म्हणजे मुमताज महल होय. तीच्या आठवणीत उत्तर प्रदेशातील आग्रा येथे बांधण्यात आलेली सुंदर वास्तू आहे. जगातील सात आश्चर्यांपैकी एक असलेल्या ताजमहाल या भव्यदिव्य अशा वास्तुरचनेमुळे आजही ती कुण्याच्याही विस्मरणात गेलेली नाही. तिच्या अलौकिक सौंदर्याने शहाजहाँ मोहित झाला नसता, तर नवलच! तिला त्याने आपली सगळ्यात आवडती बेगम म्हणुन दर्जा दिला होता. इतकेच नव्हें तर त्याने अनेक कवींना देखील मुमताजच्या सौंदर्यावर अनेक काव्य लिहीण्याकरता प्रेरित केले होते. मुमताज महल ही अत्यंत करूणा आणि नम्र हृदयाची धनी म्हणून ओळखली जायची. गरजवंतांच्या आणि अनाथ लोकांच्या मदतीकरता ती सतत तत्पर असायची. सौंदर्यसम्राज्ञी तर ती होतीच, त्याशिवाय बुद्धीमान देखील होती. शहाजहाँच्या राज्यकारभाराशी संबंधीत घेतल्या जाणाऱ्या निर्णयांमध्ये ती मोलाची मदत करत होती.

इ.स.१५९३ला एप्रील महिन्यात मुमताज महलचा जन्म उत्तर प्रदेशातील आग्रा येथे झाला. तिचे मुळनाव अर्जुमंद बानो बेगम असे होते. तिचे वडिल अब्दुल हसन आसफ खाँ हे मोगल साम्राज्यातील चौथे शासक आणि शहाजहाँचे वडिल जहाँगिर यांचे वजिर म्हणून कार्यरत होते. तसेच मुमताज महलची आत्या नुरजहाँ ही मोगल सम्राट जहाँगिर यांची सर्वात प्रिय बेगम होती. मुमताज महल ऊर्फ अर्जुमंद बानो अतिशय सुंदर आणि गुणवान स्त्री होती. ती हरमजवळ असलेल्या मीना बाजारात काचेचे आणि रेशमाचे मोती विकण्याचे काम करत असे. इ.स.१६०७ तीची भेट– खुर्रम याच बाजारात मोगल वंशाचा शहजादा शहाजहाँशी झाली. त्या सुमारास ती केवळ १४ वर्षाची होती. अगदी तेव्हांपासूनच त्यांच्या ऐतिहासिक प्रेमकथेला सुरूवात झाली. हळुहळू त्यांच्या प्रेमाचे नाते अधिकाधिक घट्ट होत गेले



**संकलन व सुलेखन**
**श्री कृष्णकुमार गो. निकोडे गुरुजी.**
**पोटेगावरोड, गडचिरोली,**
**फक्त मधुभाष– ७१३२७९६६८३.**

आणि पाच वर्षांनंतर त्यांनी इ.स.१६१२ला निकाह केला. निकाहपश्चात ती शहाजहाँची सर्वात प्रिय आणि आवडती बेगम झाली. तिच्याशिवाय शहाजहाँ एक क्षण देखील राहू शकत नव्हता. मुमताज महलने एकूण १४ अपत्यांना जन्म दिला. ज्यात ८ मुले आणि ६ मुली होत्या. परंतु त्यांची ७ अपत्येच जिवीत राहू शकली. त्यांच्या इतर मुलांचा मृत्यू किशोरावस्थेतच झाला. त्यांच्या अपत्यांमध्ये जहाँआरा बेगम, दाराशिकोह यांचा समावेश आहे. दाराशिकोह त्यांचा सर्वात सभ्य, समंजस व बुध्दीमान पुत्र होता. यालाच आपल्या मृत्युपश्चात आपला उत्तराधिकारी बनविण्याची शहांजहाँची इच्छा होती. पण पुढे त्याला आपल्या लोभी भाऊ– औरंगजेबासमोर पराजय पत्करावा लागला.

अर्जुमंद बानोच्या अलौकिक सौंदर्याने शहाजहाँ एवढा फिदा झाला, की त्याने निकाहानंतर तिचे नाव बदलून मुमताज महल असे केले. याशिवाय त्याने मुमताज महलला मलिका– ए– जमानी ही उपाधी देखील प्रदान केली होती. शहाजहाँच्या मुमताज महल व्यतिरीक्त अनेक बेगम होत्या, परंतु त्याच्या राज्यात जो सन्मान आणि मान मुमताज महलला मिळाला तसा अन्य कुणाला देखील प्राप्त झाला नव्हता. इतिहासकारांच्या मते शहाजहाँने मुमताजला आपल्या राज्यकारभाराशी संबंधीत अनेक महत्वपूर्ण निर्णय घेण्याचा अधिकार देखील बहाल केला होता. इतकेच नव्हें तर तिच्या समंतीशिवाय तो कोणतेच फरमान जारी करत नव्हता. त्यांचे उत्कट प्रेम पाहाता, असे देखील म्हंटले गेले, की शहांजहाँला आपल्या बेगमप्रती खुप ओढ आणि प्रेम होते. तो तिच्याशिवाय एक क्षण देखील राहू शकत नव्हता. म्हणून आपल्या राज्यकारभाराशी संबंधीत दौऱ्यांमध्ये सुद्धा तो तिला आपल्या सोबत नेत असे. तसेच आपली सर्वात विश्वासपात्र जोडीदार म्हणून त्याने तिचा गौरव करीत तिच्या सन्मानार्थ आग्रा येथे विशेष महाल, मुहर उजाह, शाही मुहर अशा शब्दांत वाखाणण्याजोग्या भव्यदिव्य महालांची निर्मीती केली होती.

मुमताज महलला आपल्या चौदाव्या अपत्याला– गौहर बेगमला जन्म देतांना प्रचंड प्रसववेदनेला सामोरे जावे लागले आणि त्यातच तिचा दि.१७ जून १६३१ रोजी मृत्यू झाला. आपल्या अत्यंत प्रीय बेगमच्या मृत्युपश्चात शहांजहाँ शोकसागरात बुडाला होता. असे देखील म्हंटले जाते, की मुमताज बेगमच्या मृत्युनंतर तो तब्बल २ वर्षे शोकमग्न होता. या दरम्यान आपल्या रंगीन आवडी निवडींकरता प्रसिद्ध असलेल्या शहांजहाँने आपल्या आवडी निवडी बाजूला सारल्या होत्या. या काळात त्याने कोणताही शाही लिबास परिधान केला नाही किं  कोणत्याही शाही कार्यक्रमात उपस्थित देखील राहिला नाही. मुमताज महलच्या मृत्युनंतर शहांजहाँने आपल्या प्रेमाचे अमर प्रतिक म्हणून तिच्या स्मरणार्थ आग्रा येथे ताजमहालाची निर्मीती केली. ताजमहल आपल्या भव्यदिव्यतेमुळे आणि आकर्शक कलाकृतीमुळे जगातील सात आश्चर्यांपैकी एक गणला जातो. याच्या निर्मीतीकरता तब्बल तेवीस वर्षांचा अवधी लागला. आज भारतिय आणि विदेशी पर्यटकांचे हे मुख्य आकर्षण केंद्र ठरले आहे. ताजमहाल हा मुमताज महलची अत्यंत भव्य आणि आकर्षक कब्र आहे. त्यामुळे या इमारतीला मुमताजचा मकबरा देखील म्हटल्या जाते. या शिवाय ताजमहल हे शहांजहाँ आणि मुमताज महल यांच्या अद्वितीय प्रेमाचे प्रतिक म्हणून देखील प्रसिध्द आहे.

!! स्मृतिदिनी त्यांच्या अजरामर प्रेमाला विनम्र अभिवादन !!

# राजस्थानी समाजाच्या वतीने महेश नवमी उत्साहात साजरी



**कौसडी । प्रतिनिधी**

जिंतूर तालुक्यातील बोरी येथील राजस्थानी समाजाच्या वतीने महेश नवमी दिनांक १५ जून शनिवार रोजी  सकाळी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. गावातील रामेश्वर सोमेश्वर महादेव मंदिरापासून भगवान महेशच्या प्रतिमेची शोभायात्रा काढण्यात आली.श्रीराम मंदिरात विधीवत पूजा व आरती करण्यात आली.यावेळी समाजातील दहावी – बारावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार जेष्ठ नागरिकांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीकिशन बिर्ला यांनी केले. महेश नवमी साठी मोठ्या प्रमाणात समाजातील महिला व नागरिक उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी माहेश्वरी सभेच्या पदाधिकार्यांनी प्रयत्न केले. यावेळी परभणी माहेश्वरी सभेचे सहसचिव आनंदकुमार मुरक्या

बोरी माहेश्वरी सभेचे अध्यक्ष ललित बियाणी संजय लड्डा, राजगोपाल झव्हर, राजकुमार धूत, कैलास नव्हाळ, विनोद तोष्णीवाल यांच्यासह मोठ्या प्रमाणात समाज बांधव उपस्थित होते.

# सावेंच्या पालकमंत्रिपदासाठी भाजपचे फडणवीसांना साकडे

**छत्रपती संभाजीनगर (वृत्तसंस्था)**–राज्याचे गृहनिर्माणमंत्री अतुल सावे यांना छत्रपती संभाजीनगरचे पालकमंत्री करावे, असे निवेदन भाजपच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना मुंबई येथे राज्याच्या बैठकीप्रसंगी शुक्रवारी (१४ जून) दिले. भाजपच्या शिष्टमंडळाने दिलेल्या निवेदनावर विचार करू, एवढेच फडणवीस म्हणाले. शहर जिल्हाध्यक्ष शिरीष बोराळकर यांच्यासह भाजपचे पदाधिकारी शिष्टमंडळात होते.पालकमंत्री संदिपान भुमरे लोकसभा निवडणुकीत विजयी झाले. त्यामुळे पालकमंत्रिपद रिक्त होत आहे. छत्रपती संभाजीनगर पूर्व विधानसभा मतदारसंघाचे आमदार व राज्याचे गृहनिर्माणमंत्री अतुल सावे जालना जिल्ह्याचे पालकमंत्री आहेत. आपल्या स्वजिल्ह्यात काम करायला कधीही आवडेल, अशी प्रतिक्रिया सावे यांनी भाजप पदाधिकाऱ्यांच्या मागणीवर दिली होती. भाजपला जिल्ह्यात संघटन मजबूत करण्यासाठी पालकमंत्रिपदाचा वापर करायचा असल्याचे यातून स्पष्ट होते. जिल्हाध्यक्ष शिरीष बोराळकर, प्रदेश सरचिटणीस संजय केणेकर यांनीही सावे यांना पालकमंत्री करण्याची मागणी केली होती.लोकसभेत भाजपने संदिपान भुमरे यांना निवडून आणले. लोकसभेवर दावा असताना महायुतीत ठरल्याप्रमाणे मोदींना पंतप्रधान करण्यासाठी जागा शिंदेसेनेला सोडल्याचा भाजपचा युक्तिवाद आहे. शिंदेसेनेचे प्रवक्ते आ. संजय शिरसाट यांनी यापूर्वीच संबंधित जागा शिंदेसेनेची असून भाजप पदाधिकाऱ्यांची वैयक्तिक मागणी असू शकते असेही स्पष्ट केले.

# चौसाळा येथे सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब राऊत यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमाने साजरा

**बीड । प्रतिनिधी**

कायम गोरगरीब वंचित लोकांच्या सेवेत असलेले चौसाळा परिसरातील देवीबाभळगाव येथिल रहीवाशी व संत रोहीदास प्रतिष्ठानाचे अध्यक्ष बाळासाहेब राऊत यांचा वाढदिवस चौसाळा येथे विविध सामाजिक उपक्रम राबवुन मोठया उत्साहात साजरा करण्यात आला.या सामाजिक उपक्रमामध्ये चौसाळा येथे रक्तदान शिबीर राबविण्यात आले या शिबिरामध्ये अनेकांनी रक्तदान केले या रक्तदान शिबिरावेळी प्रमुख उपस्थिती म्हणुन धर्मविर विलास(महाराज)शिंदे,बीड पंचायत समितीचे माजी सभापती काकासाहेब जोगदंड,कृषी उत्तपन्न बाजार समिती सभापती पुत्र वैभवजी मुळे पाटील,चौसाळा पत्रकार संघाचे अध्यक्ष विवेक कुचेकर,कुणाल जाधव,गणेश(बापु)जोगदंड,
विजय नवसेकर,पिन्नु(काका)शिंदे,
पांडुरंग रामगुडे,सचिन रामगुडे,के,के,वडमारे,राजु राठोड,अभिजित रिटे,धर्मराज कांबळे,भारत सुरवसे,बबलु शिंदे यांच्यासह विविध राजकिय पक्षातील कार्यकर्त्यांनी या रक्तदान शिबिरास भेट



देवुन सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब राऊत यांना शुभेच्छा दिल्या.

# पहिल्याच दिवशी गटशिक्षणाधिकारी मनोज चव्हाण यांची कोल्हा जिल्हा परिषद शाळेत हजेरी

**मानवत । प्रतिनिधी**

आज १५ जून शैक्षणिक वर्षाचा प्रारंभ  शाळेचा पहिला दिवस असल्यामूळे मानवत पंचायत समिती शिक्षण विभागाचे गटशिक्षणाधिकारी श्री मनोज चव्हाण यांनी कोल्हा केंद्रीय प्राथमिक शाळा आणि कोल्हा जिल्हा परिषद  प्रशाला या दोन्ही शाळांना शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभाच्या पहिल्याच दिवशी भेट देअऊन हजेरी लावली. यावेळी गटशिक्षणाधिकारी मनोज चव्हाण यांच्या हस्ते इयत्ता पहिलीच्या मुलांचे पुष्पगुच्छ व चॉकलेट देऊन स्वागत करण्यात आले. तसेच यावेळी सर्व वर्गातील मुलांना पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले या प्रसंगी नूतन गटशिक्षणाधिकारी मनोज चव्हाण यांचा शाळेच्या वतीने शाल श्रीफळ व पूष्पहार व पूष्पगूच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी केंद्रीय प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक श्री गजानन सरोदे , प्रशालेचे मुख्याध्यापक श्री. प्रदीपकूमार तांबे,  केंद्रप्रमुख श्री. प्रकाश मोहकरे, शिक्षक श्री सुनिलकूमार तोष्णीवाल, श्रीमती, वंदनाताई निकम , श्रीमती करूणाताई जोंधळे, श्रीमती पद्मजाताई  गोरे, श्रीमती रंजनाताई धुमाळ, श्रीमती कल्पनाताई  देशपांडे, श्रीमती मंजूषाताई  जोशी , श्रीमती प्रेमिलाताई वारकरे, श्रीमती शोभाताई तमन्ना, यांच्या सह शिक्षक व शिक्षेकेत्तर कर्मचारी या वेळी उपस्थित होते.







## विधानसभेत मोदींनी जास्त सभा घ्याव्यात

# म्हणजे आघाडीला स्पष्ट बहुमत मिळेल; मोदींचे आभार मानत शरद पवारांचा खोचक टोला

**मुंबई (वृत्तसंस्था)**–नरेंद्र मोदी यांनी विधानसभा निवडणुकीत जास्तीत जास्त सभा घ्याव्यात, त्यामुळे स्पष्ट बहुमत मिळवण्याचा आमचा मार्ग आणखी सुकर होईल, असा खोचक टोला शरद पवार यांनी लगावला आहे. लोकसभा निवडणुकीत ज्या-ज्या ठिकाणी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सभा झाल्या. त्या-त्या ठिकाणी महाविकास आघाडीला जास्त मतदान झाले असल्याचा दावा देखील शरद पवार यांनी केला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या महाराष्ट्र १८ सभा झाल्या तसेच एक रोड शो झाला. ज्या-ज्या ठिकाणी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सभा झाल्या आणि रोड शो झाला, त्या - त्या जागेवर जनतेने महाविकास आघाडीला फार मोठ्या प्रमाणात पाठिंबा दिला. आणि म्हणून विधानसभेच्या निवडणुकीच्या काळात देखील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ज्या ज्या ठिकाणी सभा होतील तेवढे जास्त आम्हाला स्पष्ट बहुमत मिळेल, त्यामुळे त्यांना देखील धन्यवाद देणे आमचे कर्तव्य असल्याचे शरद पवार यांना म्हटले आहे.लोकसभा निवडणुकीतील विजयानंतर महाविकास आघाडीची एकत्रित बैठक पार पडली. या बैठकीनंतर महाविकास आघाडीतील सर्व प्रमुख नेत्यांनी पत्रकार परिषदेच्या माध्यमातून



जनतेचे आभार व्यक्त केले. तर शरद पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे विशेष आभार मानले.अजित पवार यांच्यामुळे भाजपची ब्रँड व्हॅल्यू कमी झाली, अशी टीका संघाचे मुखपत्र असलेल्या ऑर्गनायझरमधून करण्यात आली होती. यावर शरद पवारांना प्रश्न विचारण्यात आला होता. या बाबत त्यांचा अनुभव काय तो त्यांनी सांगितला असेल असे म्हणत शरद पवारांनी अजित पवारांवर निशाणा साधला. त्यांना नेमके एवढेच सांगायचे आहे की, महाराष्ट्रातील जनतेने आमचा पराभव केला. त्याची कारणे अनेक आहे, पण ती आता आम्ही बोलू इच्छित नाही, असे उत्तर शरद पवार यांनी दिले आहे.

# श्रीशिवराज्याभिषेक दिनोत्सव सेवा समितीने व्यक्त केली ना.सुधीर मुनगंटीवार यांच्याबद्दल कृतज्ञता

## शिवराज्याभिषेक सोहळ्यासाठी चांदीची पालखी दिली होती भेट



**चंद्रपूर । प्रतिनिधी**

राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य तथा मत्स्यव्यवसाय मंत्री ना.सुधीर मुनगंटीवार यांनी किल्ले रायगड येथील शिवराज्याभिषेक सोहळ्याची शोभा वाढावी यासाठी चांदीची पालखी भेट दिली होती. त्याबद्दल रायगड येथील श्री शिवराज्याभिषेक दिनोत्सव सेवा समितीने कृतज्ञता व्यक्त केली आहे. ना. सुधीर मुनगंटीवार यांच्या मुंबई येथील शासकीय निवासस्थानी प्रत्यक्ष भेट घेऊन सेवा समितीच्या शिष्टमंडळाने त्यांचे आभार मानले.

शिष्टमंडळात श्रीशिवराज्यभिषेक दिनोत्सव सेवा समितीचे अध्यक्ष सुनील पवार, सचिव समीर धारेकर, खजिनदार राजू देसाई, कार्याध्यक्ष सनी ताठेले, रंजन गावडे आदी उपस्थित होते. समितीद्वारे ना. मुनगंटीवार यांना पत्र देत देखील कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. ना.सुधीर मुनगंटीवार यांनी श्रीशिवराज्यभिषेक दिनोत्सव सेवा समिती यांच्याकडून करण्यात आलेल्या सन्मानाचा स्वीकार केला व शिवराज्यभिषेक सोहळयासाठी पुढील काळातही सहकार्य करण्याबाबत आश्वस्त केले.

श्रीशिवराज्याभिषेक दिनोत्सव सेवा समिती दुर्गराज रायगड ही संस्थेद्वारे मागील २९ वर्षांपासून श्रीशिवराज्याभिषेक दिनोत्सव सोहळा साजरा केला जातो. शाही इतमामात उत्साहात दुर्गराज रायगडावर हा सोहळा साजरा होतो. तिथीनुसार साजरा होणारा श्रीशिवराज्याभिषेक सोहळा वेदमंत्रघोषात, परंपरेप्रमाणे विधीवत धर्मसंमत साग्रसंगित संपूर्ण सर्वसंपन्न होत असतो. या सोहळ्यासाठी चाळीस ते पन्नास हजार शिवभक्त संपूर्ण महाराष्ट्रातून किल्ले रायगडावर येत असतात. या सोहळ्याची शोभा वाढावी या उद्देशाने श्रीशिवराज्याभिषेक दिनोत्सव सेवा समितीद्वारे राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांना चांदीची पालखी भेट देण्याबाबत विनंती केली होती.

किल्ले रायगड येथील शिवराज्याभिषेक सोहळ्याची शोभा वाढावी यासाठी राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांनी श्रीशिवराज्याभिषेक दिनोत्सव सेवा समिती यांच्या विनंतीस मान देऊन चांदीची पालखी भेट दिली. याबद्दल समितीद्वारे महाराष्ट्रातील तमाम शिवभक्तांच्या वतीने ना. सुधीर मुनगंटीवार यांचे आभार व्यक्त केले.

### वर्षभर उपक्रम

छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाचे ३५०वे वर्ष राज्य सरकारच्या वतीने साजरे केले गेले. सांस्कृतिक कार्य मंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांच्या संकल्पनेतून गेल्या वर्षभरापासून विविध उपक्रम राबविण्यात आले. याच उपक्रमांचा एक भाग म्हणून ना. मुनगंटीवार यांनी रायगडावर शिवराज्याभिषेक मिरवणूक सोहळ्यासाठी चांदीची पालखी रायगड उत्सव समितीस भेट दिली होती. याशिवाय मुंबई येथे पुरातत्त्व विभागामार्फत आयोजित शिवकालीन शस्त्रास्त्रांचे प्रदर्शन, विशेष लोगोचे प्रसारण करून शासकीय कामकाजात त्याचा वापर आदी कल्पक कामे ना.सुधीर मुनगंटीवार पुढाकाराने करण्यात आली.

# सैनिक आणि मिलिटरी स्कूलमध्ये निवड होणे हे तुमच्या कठोर परिश्रम आणि निष्ठेचे फळ-आ.किशोर जोरगेवार

## सैनिक आणि मिलिटरी स्कूलमध्ये प्रवेश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा यंग चांदा ब्रिगेडच्या वतीने गौरव सोहळा




**चंद्रपूर । प्रतिनिधी**

सैनिक स्कूलमध्ये प्रवेश मिळवणे हे तुमच्या धैर्य आणि आत्मविश्वासाचे प्रतीक आहे. तुमच्या मेहनतीने तुम्ही आज इथे उभे असून सैनिक स्कूल आणि मिलिटरी स्कूलमध्ये निवड होणे हे तुमच्या कठोर परिश्रम आणि निष्ठेचे फळ असल्याचे प्रतिपादन आमदार किशोर जोरगेवार यांनी केले.

यंग चांदा ब्रिगेडच्या शिक्षण विभाग आघाडीच्या वतीने कार्यालयात राष्ट्रीय मिलिटरी स्कूल आणि सैनिक स्कूलमध्ये निवड झालेल्या चंद्रपूरातील विद्यार्थ्यांचा गौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमाला सेवानिवृत्त सैनिक रोशण अलोने, सेवानिवृत्त सैनिक अश्विन दुर्गे, ज्ञानोबा नरोटे आदींची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी पुढे बोलताना आ. जोरगेवार म्हणाले, सैनिक स्कूलमधील शिक्षण तुमच्यासाठी जीवनातील एक नवा अध्याय असून यात तुम्ही अनुशासन, नेतृत्वगुण आणि सेवा भावनेत परिपूर्ण होणार आहात. शिक्षकांच्या कष्ट आणि समर्पणामुळेच हे विद्यार्थी आज इथे उभे आहेत. तुमच्या मार्गदर्शनामुळेच त्यांना योग्य दिशा मिळाली आणि त्यांच्या क्षमतेचा पूर्ण वापर करता आला. तुमच्या अथक प्रयत्नांमुळेच आज हे विद्यार्थी सैनिक स्कूलमध्ये प्रवेश घेण्यास सक्षम झाले आहेत. पालकांच्या सततच्या पाठिंब्यामुळे आणि त्यागामुळे मुलांनी हे यश मिळवले आहे. हे यश तुमच्यासाठी फक्त एक प्रारंभ आहे. सैनिक स्कूलमध्ये तुम्हाला उत्कृष्ट शिक्षण, शारीरिक प्रशिक्षण आणि मानसिक बळ मिळणार आहे. या संधीचा पूर्ण वापर करून, तुम्ही तुमच्या कर्तृत्वाने देशाची सेवा करण्यासाठी सज्ज व्हा. नवीन ज्ञान मिळवा, नवीन गोष्टी शिका आणि आपल्याला मिळालेल्या संधीचे सोने करा. तुमची मेहनत आणि समर्पणच तुम्हाला यशाच्या शिखरावर घेऊन जाईल, असे यावेळी आमदार किशोर जोरगेवार म्हणाले.

### राष्ट्रीय मिलिटरी स्कूलमध्ये निवड झालेल्या सुनिधी निर्वाण हिचा विशेष सत्कार..

राजस्थान येथील राष्ट्रीय मिलिटरी स्कूलमध्ये देशातील १० मुलांची निवड करण्यात आली आहे. यात सुनिधी निर्वाण हिचा समावेश असून सुनिधी ही या शाळेत प्रवेश मिळवणारी राज्यातील एकमेव मुलगी आहे. तिच्या या कामगिरीबद्दल आमदार किशोर जोरगेवार यांच्या वतीने तिचा विशेष सत्कार करण्यात आला.

# जि.प.शाळा ईमारत भूमिपूजन समारंभ



**गोंडपिपरी । प्रतिनिधी**

जिल्हा वार्षिक योजना २०२३-२०२४ अंतर्गत जि प शाळा, मक्ता ,ग्राम पंचायत भंगाराम तळोधी येथील नविन ईमारतीचा भूमिपूजन सोहळा दि. १६ जून रोज रविवारला र गावकऱ्यांचा उपस्थितीत उत्साहाने पार पडला.

ग्राम पंचायत भंगाराम तळोधी अंतर्गत असलेला मक्ता गावातील गावकरी जि प शाळेच ईमारत बांधकामाचा प्रतिक्षेत होते.चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री ना. सूधीर मुनगंटीवार यांनी ईमारतीस मंजूरी देऊन गावकऱ्यांच्या मागणी पूर्ण केली.यामूळे शाळा सूरू होण्याचा पार्श्वभूमीवर गावकऱ्यांमध्ये आनंदाच वातावरण निर्माण झालं.व गावकऱ्यांनी माजी जि.प.सदस्य अमर बोडलावार व ना .सूधीर मुनगंटीवार यांचे आभार मानले.

भूमिपूजन अमर बोडलावार यांचा हस्ते पार पडले.यावेळी ग्राम पंचायत भंगाराम तळोधी सरपंच लक्ष्मीताई सोमेश्वर बालूगवार, उपसरपंच सूनिल घाबर्डे, ग्रा पं सदस्य चांदेकर ,अनिता पोटे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष काशीनाथ पोटे,शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य रवी तारोडे,,सर्व सदस्य, तसेच शिक्षिका बोंडे , शाळेतील सर्व शिक्षकवृंद , पालकवर्ग व गावकरी मोठ्या संख्येत उपस्थित राहून ना.सूधीर मुनगंटीवार चे आभार मानले.

# खेमजई येथे पर्यावरण संवर्धनासाठी सीड बॉल तयार करून लागवड अनोखा प्रयोग

## सीड बॉल तयार करून विविध प्रजातीची लागवड;भजन दिंडी व विद्यार्थी यांचे प्रचार प्रसार



**वरोरा । प्रतिनिधी**

तालुक्यातील खेमजई येथे दिनाक १६ जून रोजी पर्यावरण संवर्धनासाठी सीड बॉल तयार करून लागवड अनोखा प्रयोग राबविण्यात आला. खेमजई येथे पशुधन अधिकारी म्हणून कार्यरत डॉ.अघडते यांनी वृक्ष लागवड करण्यासाठी बीज गोळे तयार करून लागवड करणे हा नाविन्यपूर्ण उपक्रम मांडला. सदर संकल्पना ग्राम पंचायत, विकास ग्रुप व जिल्हा परिषद शाळा यांचेशी चर्चा करून राबविण्याचा निर्णय घेतला. शालेय विद्यार्थ्यांमार्फत बीज संकलनासाठी प्रति बी ऐक रुपया प्रमाणे आंबा, चिंच, कवठ, करंज यासारख्या प्रजातीचे २ हजार बीज गोळा केले.दिनाक १३ जून २०२४ रोजी जिल्हा परिषद शाळेचे विद्यार्थी व शिक्षक, ग्राम पंचायत पदाधिकारी, विकास ग्रुप , महिला बचत गट, गुरुदेव सेवा मंडळ या सर्वांनी शेण माती पासून ५ हजार सीड बॉल तयार केले.

तयार केलेले सीड बॉल गावाच्या हद्दीतील जंगलात लागवड करण्यासाठी दिनाक १६ जून २०२४ रोजी गाव ते कर्तबशहा वली टेकडी ३ किमी अंतर भजन दिंडी व विद्यार्थी रॅली काढण्यात आली. त्या दरम्यान वृक्ष लागवड विषयक प्रचार प्रसार करण्यात आला. या दिंडीत गावातील महिला व पुरुष भजन मंडळ, विविध सामाजिक संस्थेचे पदाधिकारी व कार्यकर्ते, ग्राम पंचायत पदाधिकारी, सर्व कर्मचारी , महिला बचत गटाच्या महिला, मुले मुली, युवा वर्ग, मनरेगा मजूर, ग्रामस्थ मंडळी उस्फूर्तपणे मोठ्या संख्येने सहभागी होते. सीड बॉल लागवड करण्यापूर्वी टेकडी परिसरात सरपंच मनीषा चौधरी यांचे अध्यक्षतेखाली कार्यक्रम घेण्यात आला.त्यावेळी प्रामुख्याने वन परिक्षेत्र अधिकारी सतीश शेंडे, विकास ग्रुप चे मार्गदर्शक डॉ.प्रमोद गंपावार, माजी सभापती कन्हैयालाल जयस्वाल,शिवसेना जिल्हा प्रमुख(उबाठा )मुकेश जिवतोडे, बंडू डाखरे , माजी सभापती राजू चिकटे, खेमजई येथिल सरपंच मनीषा चौधरी,माजी सभापती छोटूभाऊ शेख, अरुण चौधरी, किशोर डुकरे, कृषी विकास संस्थेचे आशिष अहिर,इत्यादी उपस्थित होते.कार्यक्रमात अभिनव कल्पना मांडून साकार करणाऱ्या डॉ.सतीश अघडते यांचा मान्यवरांचे हस्ते सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. उपक्रम यशस्वितेसाठी काम केलेल्या विविध सामजिक संघटनांचा गौरव करण्यात आला. उपक्रम यशस्वी करण्यासाठी रमेश चौधरी, विश्वनाथ तुराणकर, विलास चौधरी, शंकर धोत्रे, गोपाल राठोड, वैभव चौधरी ईश्वर हजारे, रोशन हजारे इत्यादीनी सहकार्य केले.

याप्रसंगी मान्यवरांचे भाषणे झाली त्यामधे खेमजई गावात कामात काम करणारे कर्मचारी , ग्राम पंचायत कमिटी, विविध संघटना व ग्रामस्थ,जिल्हा परिषद शिक्षक यांचे कौतुक केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपसरपंच चंद्रहास मोरे, संचालन डॉ.सतीश अघडते यांनी केले तर आभार सहाय्यक शिक्षक संजू जांभूळे यांनी केले. कार्यक्रमानंतर जंगल परिसरात विद्यार्थी व पाहुणे , ग्रामस्थ महिला यांनी सीड बॉल लागवड करण्यात आली. वृक्ष लागवडीसाठी खेमजई येथे राबविण्यात आलेला उपक्रम नाविन्यपूर्ण व प्रभावी असल्याने सर्वत्र कौतुक केले जात आहे.

# संभाव्य पूर परिस्थितीचा सामना करण्यासाठी जिल्हा प्रशासन सज्ज

## पूरप्रवण भागात प्रशिक्षण पूर्ण ; ३०० आपदा मित्र सोबतीला

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूर जिल्ह्याला पुराचा इतिहास आहे. येत्या पावसाळ्यात खबरदारीची उपाययोजना म्हणून जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांच्या सूचनेनुसार जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण चंद्रपूर व राज्य आपत्ती प्रतिसाद दल (डऊठऋ) नागपूर, यांच्या संयुक्त विद्यमानाने पूरप्रवण क्षेत्रातील तालुक्यात मान्सून पूर्वतयारीचे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. पहिल्या टप्प्यात वरोरा भद्रावती, राजुरा, कोरपना आणि जिवती ह्या तालुक्यातील पूरप्रवण भागातील ग्राम स्तरावर तसेच तालुकास्तरावर असणाऱ्या लोकांचे प्रशिक्षण पूर्ण झाले आहे. या प्रशिक्षणासाठी त्या तालुक्यातील ग्रामसेवक, तलाठी, मंडळ अधिकारी उपस्थित होते. यावेळी जिल्ह्यातील आणि तालुक्यातील तसेच त्या त्या भागात राहणाऱ्या आपदा मित्रांनाही प्रशिक्षण देण्यात आले. सदर प्रशिक्षणासाठी नागपूर येथील राज्य आपत्ती व्यवस्थापन प्रतिसाद दल (एस.डी.आर.एफ.) दलाचे पोलिस निरीक्षक डी. जी. दाते यांच्यासह १३ लोकांची टीम, राजुराचे उपविभागीय अधिकारी रविंद्र माने, तालुक्यातील प्रशिक्षणाच्या ठिकाणी संबंधित तहसीलदार योगेश कवटकर (वरोरा), अनिकेत सोनवणे (भद्रावती), प्रकाश व्हटकर (कोरपना) तसेच जिल्हा







आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सलीम शेख उपस्थित होते.

**अशी आहे तयारी :**

पूरप्रवण भागात अशा प्रकारचे प्रशिक्षण राबवण्याचे आदेश जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांनी दिले होते. तसेच निवासी उपजिल्हाधिकारी संजय पवार यांच्या निर्देशान्वये सदरील प्रशिक्षणाच्या ठिकाणी तालुक्यातील अधिकारी - कर्मचारी व ग्राम स्तरावरील पट्टीचे पोहणारे तसेच त्या ठिकाणच्या स्थानिक नागरिकांना बोलावून प्रशिक्षण देण्याचे निर्देश देण्यात आले होते.यावेळी जिल्ह्यातील विविध तालुक्यांना रबर बोट, शोध व बचाव पथकासाठी लागणारे बचाव साहित्य वितरित करण्यात आले. जिल्ह्यांमध्ये सध्या विविध ठिकाणी २८ बोट तैनात आहेत. त्यामध्ये रबर बोट व तसेच एचडीपी बोर्डचा ही समावेश आहे.जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाकडे पोलिस विभाग व इतर विभागातील प्रशिक्षित शोध व बचाव दल तैनात असून त्यामध्ये प्रशिक्षित बोट चालक व आपत्ती शोध अनुकर्ते शामील आहेत. त्याचबरोबर जिल्ह्यामध्ये ३०० आपदा मित्र हे त्यांच्या मदतीसाठी प्रशिक्षण देऊन तयार आहेत.

**या बाबींचे मिळाले प्रशिक्षण**

या प्रशिक्षणामध्ये बोट चालवणे, बोटवर कशाप्रकारे लोकांना रेस्क्यू ऑपरेशन केलं जातं त्याबद्दलची माहिती, तसेच टाकाऊ वस्तुपासून म्हणजेच इम्प्रोवाईज फ्लोटिंग डिव्हाइसेस च्या वापरापासून पुरामध्ये अडकल्यानंतर आपले जीव कसे वाचवायचे व पूर परिस्थितीमध्ये मदत मिळेपर्यंत जीव कसे वाचवायचे याबद्दलचे प्रशिक्षण त्या ठिकाणी देण्यात आले आहे.

**इरई नदीपात्राची सफाई**

चंद्रपूर महानगरास इराई नदीच्या पाण्यापासून पूर परिस्थिती निर्माण होते. ही परिस्थिती निर्माण होऊ नये याकरिता जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी इरई नदी स्वच्छ करण्याचे आदेश दिले होते त्यानुसारच इरही नदी परिसरातील वाढलेली झाडे व झुडपे काढण्याचे काम पूर्ण झालेले आहे.

# अखेर साठगाव ते रोहिना फाटा डांबरीकरणाचे काम सुरू

## उपसरपंच प्रीतीताई दीडमुठे यांच्या प्रयत्नाला यश

**चिमूर । प्रतिनिधी**

चिमूर तालुक्यातील शंकरपूर पासून साठगाव मार्गे प्रवाशांना जवळ पडणारा व अत्यंत वर्दळीचा हा मार्ग असून, पाच वर्षापासून साठगाव ते रोहना फाटा या दोन कि. मी रोडची अत्यंत दैनावस्था झाली होती. आता या रोडचे डांबरीकरणाचे काम सुरू झाल्याने नागरिकांमध्ये आनंदाची वातावरण पसरले आहे.

नागपूर जिल्ह्यातील भिवापूर हे तालुक्याचे ठिकाण असून या पंचवीस किलोमीटर अंतरामध्ये शेतकऱ्यांच्या दृष्टीने ही मोठी बाजारपेठ आहे. त्यामुळे चिमूर तालुक्यातील जवळपास १५ गावांचे भिवापूर बाजारपेठे सोबत आर्थिक संबंध जोडलेले आहे. त्यामुळे या रोडला विशेष महत्त्व प्राप्त झाले असून, दिवसेंदिवस या रोडवरील वर्दळ वाढत आहे. या दोन वर्षात साठगाव येथील उपसरपंच सौ प्रीतीताई दीडमुठे यांनी डोकेफोड आंदोलन, अनेकदा रोडवर बेशरम ची झाडे लावून तर या रोडवर उपोषणाला बसून आंदोलने केली. तरीही प्रशासनाला जाग आली नाही. मागील वर्षी उपसरपंच प्रीतीताई दीडमुठे यांनी रोडवर बेशरमची झाडे



लावून आंदोलन केले, तेव्हा त्या दिवशी प्रशासनाने जेसीबी पाठवून रोडवरील फक्त खड्डे बुजविण्याचे काम केले. परंतु या दोन कि. मी. रोडचे पक्के बांधकाम करण्यास वेळोवेळी टाळाटाळ केली. या दोन वर्षांमध्ये कितीतरी वेळा उपसरपंच यांनी या रोडच्या बांधकामासाठी संबंधित विभागाला पत्रव्यवहार केला परंतु बांधकाम विभागाला जाग आली नाही. त्यामुळे उपसरपंच प्रीतीताई दीडमुठे यांनी गावातील नागरिकांना घेऊन दिनांक १८ जून २०२४ ला बांधकाम विभाग चिमूर च्या समोर वीस प्राशन करून आत्मदहन करण्याचा इशारा पत्राद्वारे संवर्ग विकास अधिकारी चिमूर तसेच तहसीलदार चिमूर यांना दिला. त्याची दखल घेऊन प्रशासनाने आज दिनांक १६ जूनला सकाळी या रोडच्या डांबरीकरणाचे काम सुरू केले. शेवटी साठगाव येथील उपसरपंच प्रीतीताई दीडमुठे यांनी या रोडच्या कामासाठी वेळोवेळी केलेल्या आंदोलनामुळे त्यांच्या या कार्याला यश आले. त्यामुळे परिसरातील नागरिकांनी आनंद व्यक्त केला असून त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# पीक विम्याचा परतावा तात्काळ द्या-डॉ.अंकुश आगलावे

**वरोरा । प्रतिनिधी**

पीक विम्याचा परतावा शेतक-यांना तात्काळ देण्यासंबंधी केंद्रीय मानवाधिकार संगठनने विदर्भ प्रदेश अध्यक्ष डॉ. अंकुश आगलावे यांनी जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांना निवेदन देवून मागणी केली आहे.



ग्रामीण भागातील असलेल्या शेतक-यांचे अर्थकारण संपूर्ण हे शेतीवर अवलंबून असते. शेतीतून निघालेला शेतमालाला जर योग्य भाव मिळाला नाही तर शेतक-यांपुढे जगायचे कसे हा प्रश्न उपस्थित होत आहे. . अवकाळी पावसामुळे शेतक-यांच्या पिकांना मोठे नुकसान झाले आहे. कर्जबाजारीमुळे अगोदरच हवालदिल असलेल्या शेतक-यांचे अवकाळी पावसाळा चांगलेच कंबरडे मोडलेले आहे.शेतक-यांनी एक रूपयात पीक विमा काढला होता. परंतु अतिवृष्टीमुळे अनेक शेतक-यांचे पीकाचे नुकसान झाले आहे. शेतक-यांनी ७२ तासाच्या आत क्लेम केले परंतु अजूनही काही शेतक-यांचे खात्यात रक्कम जमा झाली नाही. त्यामुळे पीक विम्याची रक्कम अद्यापही मिळाली नसल्याने शेतक-यांमध्ये रोष आहे.

# महेश नवमी निमित्त निघालेल्या शोभा यात्रेचे यंग चांदा ब्रिगेडच्या वतीने स्वागत

## शोभायात्रेत सहभागी समाज बांधवांना शीतपेयाचे वाटप

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

महेश नवमी निमित्त शहरातून निघालेल्या शोभायात्रेचे गांधी चौक येथे यंग चांदा ब्रिगेडच्या वतीने स्वागत करण्यात आले. यावेळी शोभायात्रेत सहभागी समाज बांधवांना यंग चांदा ब्रिगेडच्या वतीने शीतपेयाचे वाटप करण्यात आले.

यावेळी यंग चांदा ब्रिगेडचे रशिद हुसेन, विश्वजित शहा, चंद्रशेखर देशमुख, राम जंगम, सायली येरणे, वंदना हजारे, कालिदास धामनगे, कैलास धायगुने, कार्तिक बोरेवार, महेश गहुकर यांच्यासह यंग चांदा ब्रिगेडचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.




दरवर्षीप्रमाणे यंदाही चंद्रपूरात महेश नवमी समाज बांधवांच्या वतीने मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी संध्याकाळी शोभायात्रा काढण्यात आली. लक्ष्मी नारायण मंदिर येथून या शोभायात्रेला सुरुवात झाली. सदर शोभायात्रेचे स्वागत करण्यासाठी यंग चांदा ब्रिगेडच्या वतीने गांधी चौक येथे स्वागत मंच उभारला होता. ही शोभायात्रा यंग चांदा ब्रिगेडच्या स्वागत मंचाजवळ पोहोचताच यंग चांदा ब्रिगेडच्या वतीने शोभायात्रेचे स्वागत करण्यात आले. यावेळी शोभायात्रेत सहभागी समाज बांधवांना यंग चांदा ब्रिगेडच्या पदाधिकाऱ्यांनी शीतपेयाचे वाटप केले. सदर शोभायात्रेत समाज बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# दिव्यांगानी जाणीव जागृती मेळावाला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आव्हान

**तळोधी (बा) । प्रतिनिधी**

नागभीड तालुक्यातील प्रगती दिव्यांग मंच तळोधी बा. व परिसर या दिव्यांग संघटनेच्या वतीने साई मंदिर तळोधी येथील सांस्कृतिक सभागृहात भव्य जाणीव जागृती मेळाव्याचे आयोजन दिनांक १८ जून रोज मंगळवार ला सकाळी १०:३० पासून आयोजित केला आहे. या मेळाव्याला आम्ही आमच्या आरोग्यासाठी संस्था कुरखेडा चे विश्वस्त डॉ. सतीश गोगुलवार, मार्गदर्शक व प्रकल्प समन्वयक संगीता तुमडे, तहसीलदार प्रताप वाघमारे, उमेद कक्ष व्यवस्थापक नैताम,उद्योगशीलता समन्वयक अमीर तुराळे आदी ची उपस्थिती असणार आहे. या मेळाव्यात दिव्यांग उपयोगी साधनाचा वितरण करण्यात येत असून दिव्यांग्याच्या विविध योजनाचा लाभ,समस्या या बाबतीचे निवारण व मार्गदशन मिळण्याकरिता या मेळावाव्यास दिव्यांग बांधवानी उपस्थिती रहावे असे आव्हान प्रगती दिव्यांग मंच चे अध्यक्ष तुलोपचंद गेडाम यांनी केले आहे.

**जावक क्रमांक 1197/20221.**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,**
**पुर सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,**
**चंद्रपूर, मधुबन प्लाझा, मुदा रोड**
**शिवाजीनगर, चंद्रपूर, चंद्रपूर चंद्रपूर**
**दिनांक १२.६.२०१ चंद्रपूर**

# चौकशीची जाहीर नोटीस

एस.आर.एन. क्रमांक: CDP/12154/18/24
फेरफार अहवाल अर्ज क्रमांक:
सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक श्री हनुमान मंदिर सेवा समिती, विहीरगाव, ता.मुल, जि. चंद्रपुर बाबत
न्यासाचा पता-प्रशांत शामराव सिडाम, मुल, वार्ड नं. १६. मुल, चंद्रपूर, मूळ, मूळ
अर्जदार-जितेंद्र शामराव गुरनुले,

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त, चंद्रपूर, है वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्द्यावर चौकशी करणार आहेत.

(१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि संदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?

**जंगम मिळकत (वर्णन)**

| अ.क्र. | तपशील | अदाजे मूल्य |
|---|---|---|
| 1 | PRESIDENT JITENDRA SHAMARAO GURNULE | 15000.00 |

(अ) जंगम मिळकतः रोख रु. १५०००/- मात्र
(अक्षरी रुपये पंधरा हजार मात्र फक्त)

**स्थावर मिळकत (वर्ण)**

| अ.क्र. | शहर किंवा गाव | सी.एस किंवा महानगरपालिका किंवा सर्वेक्षण क्र. | क्षेत्र | मूल्याकन | मुदत/कालावधी किंवा स्वरूप | अंदाजे मूल्य |
|---|---|---|---|---|---|---|

(ब) स्थावर मिळकतः रोख रु. /- मात्र
(अक्षरी रुपये मात्र फक्त)

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेन त्यांनी त्याची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवा त्यानंतर आलेल्या कैफियतींचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही अ समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील

ही नोटीस माझे सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्यानिशी आज दिनांक १२-०६-२०२४ रोजी दिली.

**अधिक्षक**
**सार्वजनिक न्यास नोंदणी**
**कार्यालय चंद्रपूर**

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .